# ई - पोलीस पत्रिका

दिनांक ०३/०२/२०२५ अनु.क्र. २४

**(अमरावती शहर पोलीसांची २०२५ ची उद्दिष्टे)**

- **नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.**
- **उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीसदल.**
- **महीला, मुले व जेष्ठ नागरिकांचीसुरक्षा.**
- **जातीयसलोखा वाढविणे.**
- **संघटितगुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरुध्द कठोर कारवाई.**
- **रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.**
- **पोलीसकोठडीतगुन्हे घडु न देणे.**
- **आरोपी पोलीसांचे ताब्यातुन पळुन जाऊ नयेत.**
- **"सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातुन साध्य करु.**

## भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## रजा

**१.पोआअ/आस्था-५/सिक अहवाल/७१४/२०२५अमरावती शहर दिनांक २४/०१/२०२५**

## आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार यांचा खालील नमुद रुग्णनिवेदन कालावधी त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील तरतुदीनुसार मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम/ब.क्र./नाव | नेमणुक | रुग्णनिवेदन कालावधी | प्राधिकार |
|---|---|---|---|---|
| १ | मपोशि/१२८, खुशी चव्हाण | मोपवि | दि.१६/१०/२०२४ ते दि.२४/१०/२०२४ पर्यत ०९ दिवस परिवर्तीत रजा मंजुर | **नियम ६१ नुसार** |
| २ | मपोहवा/८३,आशा रक्षे | नियंत्रण | दि.१४/१०/२०२४ ते दि.२४/१०/२०२४ पर्यत ११ दिवस परिवर्तीत रजा मंजुर | **नियम ६१ नुसार** |
| ३ | सपोउपनि/७११,राजु पाचंगे | नियंत्रण | दि.१६/०९/२०२४ ते दि.१६/१०/२०२४ पर्यत ३१ दिवस परिवर्तीत रजा मंजुर | **नियम ६१ नुसार** |
| ४ | पोहवा/१६६७, अकबर हुसेन | मोपवि | दि.२६/१०/२०२४ ते दि.०५/११/२०२४ पर्यत ११ दिवस परिवर्तीत रजा मंजुर | **नियम ६१ नुसार** |
| ५ | मपोहवा/१०७७,संगीता तळहांडे | नियंत्रण | दि.०५/०८/२०२४ ते दि.२१/०८/२०२४ पर्यत १७ दिवस परिवर्तीत रजा मंजुर | **नियम ६१ नुसार** |
| ६ | सपोउपनि/९५५,संजय निंभोरकर | मोपवि | दि.११/०९/२०२४ ते दि.११/१०/२०२४ पर्यत ३१ दिवस परिवर्तीत रजा मंजुर | **नियम ६१ नुसार** |
| ७ | मपोशि/१३७८,जागृती तोटे | पोलीस मुख्या | दि.१८/१२/२०२४ ते दि. २३/१२/२०२४ पर्यत ०६ दिवस परिवर्तीत रजा मंजुर | **नियम ६१ नुसार** |
| ८ | मपोशि/१६५६,स्वाती घुसे | शवाशा पश्चिम | दि.०५/११/२०२४ ते दि.०६/१२/२०२४ पर्यत ३२ दिवस परिवर्तीत रजा मंजुर | **नियम ६१ नुसार** |
| ९ | चापोहवा/१०९२,योगेश गिरासे | शवाशा पश्चिम | दि.२३/१०/२०२४ ते दि.१६/११/२०२४ पर्यत २५ दिवस परिवर्तीत रजा मंजुर | **नियम ६१ नुसार** |
| १० | मपोशि/१३१६,मीरा चव्हाण | शवाशा पुर्व | दि.०४/११/२०२४ ते दि.१७/११/२०२४ पर्यत १४ दिवस परिवर्तीत रजा मंजुर | **नियम ६१ नुसार** |
| ११ | मपोहवा/९३१,मनिषा वानखडे | नियंत्रण | दि.०५/०९/२०२४ ते दि.१४/११/२०२४ पर्यत ७१ दिवस अर्जित रजा मंजुर | **नियम ५० नुसार** |
| १२ | मपोशि/१७४९,माया भोरखडे | पोलीस मुख्या | दि.११/१२/२०२४ ते दि.२३/१२/२०२४ पर्यत १३ दिवस अर्जित रजा मंजुर | **नियम ५० नुसार** |
| १३ | मपोशि/४०५,पल्लवी चिताडे | पोलीस | दि. ११/१२/२०२४ ते दि.१८/१२/२०२४ | **नियम ५०** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | मुख्या | पर्यत ०८ दिवस अर्जित रजा मंजुर | **नुसार** |
| १४ | मपोहवा/०५,वंदना केळझरे | पोलीस मुख्या | दि. २५/११/२०२४ ते दि. ०४/१२/२०२४ पर्यत १० दिवस परिवर्तीत रजा<br>दि.०५/१२/२०२४ ते दि. १७/१२/२०२४ पर्यत १३ दिवस अर्जित रजा मंजुर | **नियम ६१ नुसार**<br>**नियम ५० नुसार** |
| १५ | पोहवा/९८२,राजेश सदाशिवे | मोपवि | दि. १६/०९/२०२४ ते दि.२३/०९/२०२४ पर्यत ०८ दिवस परिवर्तीत रजा<br>दि.२४/०९/२०२४ ते दि.१९/१०/२०२४ पर्यत २६ दिवस अर्जित रजा मंजुर | **नियम ६१ नुसार**<br>**नियम ५० नुसार** |
| १६ | पोशि/६८०,मो.अदी किदवाई | पोलीस मुख्या | दि. २८/११/२०२४ ते दि.०७/१२/२०२४ पर्यत १० दिवस परिवर्तीत रजा<br>दि.०८/१२/२०२४ ते दि.२४/१२/२०२४ पर्यत १२ अर्जित रजा मंजुर | **नियम ६१ नुसार**<br>**नियम ५० नुसार** |
| १७ | पोशि/४४९,विजय यादव | मोपवि | दि. १४/१०/२०२४ ते दि.२३/१०/२०२४ पर्यत १० दिवस परिवर्तीत रजा<br>दि. २४/१०/२०२४ ते दि.०५/११/२०२४ पर्यत १३ दिवस अर्जित रजा मंजुर | **नियम ६१ नुसार**<br>**नियम ५० नुसार** |

तसेच वर नमुद अमलदार यांना त्यांचे मंजुर रजेची माहिती देऊन आपल्या येथील सिक रजिस्टरमध्ये तशी नोंद करण्यात यावी.

**२.पोआअ/आस्था-५/बालसंगोपन रजा/८१६ /२०२५अमरावती शहर दिनांक २८/०१/२०२५**

## आदेश

खालील नमुद महिला पोलीस अंमलदार यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कालावधी करीता त्यांचे बाळाचे संगोपनाकरीताविशेष रजा शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक संकीर्ण-२०१७/प्र.क्रं.२५/सेवा-६, दिनांक .. २३/७/२०१८ मधील तरतुदीनुसार अटी वशर्तीचे अधिन राहून बालसंगोपन रजा मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्रं. | पदनाम व ब.नं. व नांव, व नेमणूक | प्रसुतीचा दिनांक | अपत्यांची संख्या | रजा कोणत्या अपत्या करीता | मागणी केलेली रजा |
|---|---|---|---|---|---|
| १ | मपोशि/७४०,ज्योती दा.साबळे (पोलीस मुख्या) | २८/०६/२००८ | २ | दुस-या | ३० दिवस |
| २ | मपोशि/१३१९,जयश्री जी.बांडे (बडनेरा) | ०८/०५/२००७ | २ | दुस-या | ३० दिवस |
| ३ | मपोशि/१३७३,अर्चना ब.खंडारे (पोलीस मुख्या) | ३०/०४/२०२४ | २ | दुस-या | ६० दिवस |
| ४ | मपोहवा/०५,वंदना गं.केळझरे (पोलीस मुख्या) | २४/१०/२००७ | १ | दुस-या | ६० दिवस |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | मपोशि/१३७८,जागृती सं.तोटे (पोलीस मुख्या) | ०७/०६/२००७ | २ | जुळे | ६० दिवस |
| ६ | मपोशि/५९६,पुजा ज.पांडे (पोलीस मुख्या.) | ०७/०४/२०२३ | १ | पहिल्या | ६० दिवस |
| ७ | मपोहवा/११९,शिल्पा शिरभाते (पोलीस मुख्या.) | २८/०९/२००८ | २ | पहिल्या | ६० दिवस |
| ८ | मपोना/१४६१,उषा वि.सुरवाडे (सिटी कोतवाली) | २२/०२/२००७ | १ | पहिल्या | ३० दिवस |
| ९ | मपोशि/२६७,रेखा कि.डोळस (सिटी कोतवाली) | २३/१२/२०१५ | २ | दुस-या | ३० दिवस |
| १० | मपोशि/९५१,प्रिती ओ.खांडेकर (पोलीस मुख्या) | २२/११/२०२१ | २ | दुस-या | ३० दिवस |
| ११ | मपोहवा/७२१,उज्वला अ.झाडे (पोलीस मुख्या) | ०७/१२/२००७ | २ | दुस-या | ६० दिवस |
| १२ | मपोशि/१५८७,अश्विनी नांदुरकर (सिटी कोतवाली) | ०२/०८/२०२४ | २ | दुस-या | ६० दिवस |

**अटी व शर्ती :-**

१. मुलाचे वय १८ वर्षे होई पर्यंत सदर रजा लागु राहील.

२. एका वर्षामध्ये कमाल २ महिन्याच्या कमाल मर्यादेत सदर रजा घेता येईल.

३. पहिल्या दोन जेष्टतम हयात मुलांकरीता सदर रजा लागु रहील.

४. उपरोक्त महिला कर्मचाऱ्यांना बालसंगोपन रजेच्या कालावधीसाठी रजेवर जाण्याच्या लगतपुर्वी जेवढे वेतन मिळत असेल तेवढीच रजा वेतन देण्यात येईल.

५. सदर कालावधीत रजा प्रवास सवलत (LTC) अनुज्ञेय ठरनार नाही.

**३.पोआअ/आस्था-५/अर्जित रजा/९४८/२०२५अमरावती शहर दिनांक ३१/०१/२०२५**

## आदेश

**विषय :-** सन २०२४ मध्ये मंजुर असलेली १५ दिवस अर्जित उपभोगणे बाबात.

--००--

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, सन-२०२४ या कॅलेंडर वर्षात ज्या पोलीस अंमलदार यांना १५ दिवस अर्जित रजा मंजुर करण्यात आलेली आहे.तथापी काही पोलीस अंमलदार यांना विविध बंदोबस्त व शासकीय कामामुळे मंजुर झालेली अर्जित रजा उपभोगता आलेली नाही.अशा पोलीस

अंमलदार यांनी मंजुर झालेली अर्जित रजा परत अर्जित रजेच्या खाती जमा करण्याबाबत विनंती अर्ज कार्यालयास सादर केले आहे.

अर्जित रजा मंजुर करण्यात आल्यानंतर तेवढया अर्जित रजा लेख्यामध्ये वजा करण्यात येत असुन उपभोगलेल्या रजा परत अर्जित रजा खात्यात जमा करण्याची कार्यवाही नियमास अनुसरुन नाही.त्यामुळे पोलीस अंमलदार यांना सन -२०२४ मध्ये मंजुर करण्यात आलेल्या १५ दिवस अर्जित रजेपैकी न उपभोगलेली अर्जित रजा **माहे डिसेंबर २०२५ पावेतो उपभोगण्याची परवानगी देण्यात येत आहे.**

तरी सर्व वरीष्ठ पोलीस निरीक्षक, पो.स्टे./ शाखा व राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर यांनी उपरोक्त केल्याप्रमाणे पोलीस अंमलदार यांना अर्जित रजेवर सोडण्याबाबतची कार्यवाही करावी.

**४.पोआअ/आस्था-५/प्रसुती रजा/९४९/२०२५अमरावती शहर दिनांक ३१/०१/२०२५**

## आदेश

खालील नमुद महिला पोलीस अंमलदार यांना त्यांच्या न ावासमोर दर्शविल्या प्रमाणे वैद्यकीय प्रमाणपत्राचे आधारे महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ७४ तसेच वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अरजा-१४०९/प्र.क्रं.८/०९/सेवा-६, दिनांक २४/८/२००९ व दि.१५/१/२०१६ चे तरतुदीनुसार १८० दिवस प्रसुती रजा, रजा वेतनासह प्रसुतीच्या संभाव्य तारखे पासुन अथवा प्रसुती करीता रजेवर सुटल्याचे तारखे पासुन मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम/ब.नं./ नाव | नेमणुक | नियुक्ती दिनांक | प्रसुतीची वेळ | प्रसुतीची संभाव्य तारीख | अपत्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मपोशि/१६९७, अंजली प्रल्हदराव धोंगडे (वानखडे) | पोलीस मुख्यालय | दि.२२/०७/२०१६ | पहिली | दि.१६/०३/२०२५ | - |

वरिल नमुद महिला पोलीस अंमलदार यांना रजेवर सोडल्याचा व हजर झाल्याचा दिनांक या कार्यालयास कळवावा.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरण

## शिक्षा

**१.पोआअश/विचौ-१/निलंबन/पोउपनि-प्रणित पाटील/६५३/२०२५ अमरावती शहर दिनांक २२/०१/२०२५**

## निलंबन आदेश

१. ज्या अर्थीतुम्ही श्री प्रणित पाटील, पोलीस उपनिरीक्षक नेमणूक - पोलीस स्टेशन गाडगेनगर, अमरावती शहर येथे नेमणूकीस असून तुम्ही दिनांक ०३/१०/२०२४ पासून परस्पर रुग्णनिवेदन करुन कर्तव्यावर अनुपस्थित आहे. अतिमहत्वाचा विधानसभा निवडणूक-२०२४ बंदोबस्त असतांना तुम्हाला कर्तव्यावर हजरहोणेकरिता पोलीस स्टेशन गाडगेनगर कार्यालया कडुन वारंवार कळविण्यांत आले असता तुम्ही कर्तव्यावर हजर झाले नाही. विधानसभा निवडणूक-२०२४ हा अति महत्वाचा बंदोबस्त असतांना सुध्दा कर्तव्याची जाण न ठेवता तुम्ही रुग्णनिवेदना मधून कर्तव्यावर अनुपस्थित राहीले.

२. तसेच सन २०२४ मध्ये विधानसभा निवडणूक अतिमहत्वाचा बंदोबस्त असतांना मनूष्यबळाची कमतरता असतांना तुम्हाला वारंवार कर्तव्यावर हजर होणे बाबत कळविण्यांत आले असतांना सुध्दा तुम्ही आज पावेतो कोणत्याही प्रकारचे वैद्यकिय प्रमाणपत्र व कागदपत्रे सादर केली नाही, तसेच वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पूर्व सूचना न देता रजेशिवाय गैरहजर आहात व मुख्यालयात गैरहजर आहात. अशा तुमच्या अत्यंत बेशिस्त, बेजबाबदार, अशोभनिय व हलर्गीपणाच्या कृत्यामुळे पोलीस खात्यातील शिस्तीचा भंग होते. तुम्ही दिर्घकाळ अनुपस्थित राहल्याने कार्यालयीन शिस्तीवर, कामकाजावर परिणाम होत असून तुमच्या अनधिकृत गैरहजेरी व बेशिस्त वर्तणूकी मुळे खात्यातील इतर पोलीस अधिकारी/अंमलदार यांचेवर परीणाम होईल.

३. त्याअर्थी आता मुंबई पोलीसकायदा १९५१ मधीलकलम २५ मधील १ (ख) आणि मुंबई पोलीस (शिक्षा व अपिल) नियम १९५६ मधील नियम ३ (१) (अ-२) च्या तरतुदीनुसार, तसेच विभागीय चौकशी नियम पुस्तीका१९९१ मधील प्रकरण दोन मधील नियम २.२ (अ) च्या तरतुदीनुसार आदेशाच्या दिनांका पासुन शासन सेवेतुन निलंबित करण्यात येत आहे.

४. त्यानुसार असेही आदेश देण्यात येत आहेकी, महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वियेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढुन टाकने यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ चे नियम ६८(एक) (अ) नुसार निर्वाह भत्ता व त्यावरील अनुज्ञेय महागाई भत्ता देण्यात येईल.

५. आणखी असेही आदेश देण्यात येत आहेकी, जोपर्यंत निलंबनाचे आदेश अस्तित्वात असतीलतो पर्यंत श्री. प्रणित पाटील, पोलीस उपनिरीक्षक, यांचे मुख्यालय पोलीस मुख्यालय, अमरावती शहर हे राहील. निलंबन काळात तुम्हाला मुख्यालयात हजेरी देणे अनिवार्य राहील. तसेच तुम्हाला पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांच्या पुर्व परवानगी शिवाय मुख्यालयसोडता येणार नाही. पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांच्या पुर्व परवानगी शिवाय तुम्ही मुख्यालय सोडल्यास ती तुमची गैरवर्तणुक ठरेल व त्या कारणासाठी वेगळया शिस्तभंगाच्या कारवाईस तुम्ही पात्र ठराल, तसेच मुख्यालयी हजर नसल्याचे आढळून आल्यास त्या दिवसाचा निर्वाह भत्ता गमावल्यास तुम्ही जबाबदार राहाल.

६. सदर निलंबनाचा आदेश अस्तित्वात असे पर्यंत तुम्हांस कोणत्याही प्रकारचा खाजगी उद्योग अथवा नोकरी करता येणार नाही. खाजगी उद्योग अथवा नोकरी केली नसल्याचे प्रमाणपत्र महिना पूर्ण झाल्या नंतर या कार्यालयास सादर करावे लागेल. जर या कालावधीत कोणतीही खाजगी नोकरी अथवा उद्योग केल्याचे आढळुन आल्यास तुमच्या विरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल.

# भाग-३

## <u>वेतन/संरचना/वेतन निश्चिती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण</u>

## <u>संकीर्ण</u>

**१.पोआअ/पशा-१/विदेश दौरा/पोउपआ-पाटील/७९६/२०२५, अमरावती शहर दिनांक २८/०१/२०२५**

**संदर्भ** - श्री. सागर पाटील, पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-१, अमरावती शहर यांचा दि. १८.०१.२०२५ रोजीचा विनंती अर्ज.

**विषय** - पर्यटनाकरीता विदेश दौरा दुबई (देश- सौदी अरेबिया) येथे जाणेची परवानगी मिळणेबाबत.

## <u>आदेश</u>

उपरोक्त संदर्भ व विषयान्वये सागर पाटील, पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-१, अमरावती शहर यांनी विदेश दौरा दुबई (देश - सौदी अरेबिया) येथे पर्यटनाकरीता जाण्याची परवानगी मिळणेबाबत तसेचसदर विदेश दौ-यासाठी दि. ०५.०२.२०२५ ते १२.०२.२०२५ करीता अर्जित रजा मिळणेबाबत विनंती अर्ज सादरकेलेला आहे.

विदेश दौरा दुबई (देश - सौदी अरेबिया) येथे जाणेकरीता त्यांना अंदाजे १,५०,०००/- खर्च अपेक्षित आहे. सदर रकमेची जुळवाजुळव त्यांनीखालील प्रमाणेकेली आहे.

| अ. क्र. | रक्कम | तपशिल |
|---|---|---|
| १ | अंदाजे रु. १,५०,०००/-<br>(रुपये- एक लाख पन्नास हजार) | दुबई येथे जाणे-येणे, राहणे व इतर सर्व खर्च श्री. सागर पाटील, पोलीस उपआयुक्तहे स्वत:चे वेतना मधुन भागविणार आहे. |

श्री. सागर पाटील, पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-१, अमरावती शहर यांचेविरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरु अथवा प्रस्तावित नाही किंवा कोणतेही न्यायालीन प्रकरण प्रलंबीत नाही.

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.परदौ-१४१४/ प्र. क्र.२६/११, दि. २९.१२.२०१४ मधील परिच्छेदक्र. १३ व मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्र. पोमसं/६/ एनजीओ/ खाजगी विदेश दौरा/संकीर्ण/२२२/२०१७ दिनांक २१.०८.२०१७ मधीलतरतुदीनुसारश्री. सागर पाटील, पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-१, अमरावती शहर यांना त्यांचे विनंती अर्जानुसार दुबई, देश - सौदी अरेबिया येथे स्वखर्चाने खाजगी पर्यटन विदेश दौराकरण्याची परवानगी देण्यात येत आहे. तसेच सदर दौऱ्याकरीता दि. ०५.०२.२०२५ ते १२.०२.२०२५ पर्यंत ०८ दिवस अर्जित रजा मंजूर करण्यात येत आहे.

श्री. सागर पाटील, पोलीस उपआयुक्त, (परिमंडळ-१), अमरावती शहर यांचे उपरोक्त मंजूर करण्यात आलेल्या रजा कालावधी मध्ये त्यांचे कडील परिमंडळ-१, या पदाचा अतिरिक्त कार्यभार श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस उपआयुक्त (मुख्यालय), अमरावती शहर यांचे कडे सोपविण्यात येत आहे.

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,
पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस